ई-गव्हर्नन्स अंतर्गत विविध प्रकल्पांसाठी कार्यरत सल्लागार यांचे देयकाची रक्कम अदा करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक: ई-गव्ह २०२४ /प्र.क्र.०७/संगणक
चौथा मजला, विस्तार इमारत, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४००० ०३२
दिनांक : ०६ ऑगस्ट, २०२६

वाचा :

१) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र ई-गव्ह/२०२४/प्र.क्र.७/संगणक २६ नोव्हेंबर,२०२४.
२) प्रकल्प अंमलबजावणी समिती बैठक, दि.०४.१२.२०२५.
३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र ई-गव्ह/२०२४/प्र.क्र.७/संगणक ०८ जानेवारी,२०२६.
४) आयुक्त (शिक्षण), पुणे यांचे पत्र क्र. आशिक/२०२६/सल्लागार/ईगव्ह/१४३/२०२६ दि.२३.०३.२०२६ व २५.०६.२०२६

प्रस्तावना :-

शालेय शिक्षण व क्रीडा विभागांतर्गत ई-गव्हर्नन्स प्रकल्पांसाठी नवीन सल्लागार कंपनीची निवड करण्यासाठी दि.०५.११.२०२४ व १८.११.२०२४ रोजीच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत विभागासाठी M/s KPMG Advisory Services Pvt Ltd. व M/s Pricewaterhousecoopers Pvt.Ltd. कंपनींची नेमणूक करण्याचा निर्णय प्रकल्प अंमलबजावणी समितीने घेतला आहे. त्यानुसार शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.ई-गव्ह/२०२४/प्र.क्र.७/संगणक दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ पासून कंपनीची नेमणूक करण्यात आली आहे. सदर्भ क्र.४ अन्वये सदर कपंनीस १ वर्षासाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागांतर्गत ई-गव्हर्नन्स प्रकल्पांसाठी सद्यस्थितीत M/s KPMG Advisory Services Pvt Ltd. व M/s Pricewaterhousecoopers Pvt.Ltd. या कंपनीकडून तांत्रिक सल्लागार नेमणूक करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने संदर्भ क्र ४ अन्वये आयुक्त (शिक्षण) यांनी सदरची देयके अदा करण्यास प्रशासकीय मान्यता तसेच आर्थिक तरतूद उपलब्ध करून देण्याबाबत शासनास विनंती केली आहे. त्यानुसार M/s KPMG Advisory Services Pvt Ltd. या कंपनीचे मार्च, २०२६ ते एप्रिल, २०२६ या कालावधीतील रू.७२,५४,६४०/- व M/s Pricewaterhousecoopers Pvt.Ltd. या कंपनीचे फेब्रुवारी, २०२६ ते एप्रिल, २०२६ या कालावधीतील रू.२२,३०,२००/- असे एकूण रु.९४,८४,८४०/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

आयुक्त (शिक्षण), पुणे यांनी संदर्भाधीन क्र.४ च्या पत्रान्वये केलेल्या विनंतीनुसार M/s KPMG Advisory Services Pvt Ltd. या कंपनीचे मार्च, २०२६ ते एप्रिल, २०२६ या कालावधीतील रू.७२,५४,६४०/- व M/s Pricewaterhousecoopers Pvt.Ltd. या कंपनीचे फेब्रुवारी, २०२६ ते एप्रिल, २०२६ या कालावधीतील रू.२२,३०,२००/- असे एकूण रु.९४,८४,८४०/- इतक्या रक्कमेस याद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. याबाबत निधी वितरणाचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

२. सदरचा खर्च मागणी क्रमांक ई-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण, ८००-इतर खर्च (०२) संकिर्ण (०२)(५१) ई-गव्हर्नन्स कार्यक्रम (२२०२H४५४), ३१ सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षातून सन २०२६-२७ च्या उपलब्ध तरतुदीमधून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्तीय अधिकार नियमपुस्तिका २०१५ दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील उपविभाग- २ मधील अनुक्रमांक २७ अ मधील नियम क्र. ७६ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८०६१५३३४८१३४९ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ARJUN ASHOK GIRAHAM

Digitally signed by ARJUN ASHOK GIRAHAM
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SESD, 2.5.4.20=C1300422597C5149006FE3B151E37C83067DCDA2A58855301754748501323 23F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=41524CD000BBC1D5D1FF212378815B6BE4870FD0FCD2031260BAA18314B15437, cn=ARJUN ASHOK GIRAHAM
Date: 2026.08.06 15:34:27 +05'30'

(अर्जुन गिऱ्हाम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई.
२) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर १/२.
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर १/२.
६) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
७) कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) निवडनस्ती/संगणक.